# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. १६/११/२०१७

दिनांक १६.११.२०१७ रोजी गोपनिय सुत्राकडुन मिळालेल्या माहितीच्या आधारे मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख, तसेच मा. अपर पोलीस अधिक्षक गडचिरोली श्री. महेंद्र पंडीत यांचे आदेशान्वये पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली यांचे मार्गदर्शनाखाली दिनांक १६.११.२०१७ रोजी पोलीस स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली येथील पोलीस उप निरीक्षक युवराज घोडके, सोबतचे पथकातील भाऊराव बोरकर, प्रेमकुमार दुर्गे, प्रदिप चवरे अशा प्रकारचा पोलीस पथक मौजा चामोर्शी येथे पोहचुन अवैध दारु रेड संबधाने सापळा रचुन बसले असता, बेकायदेशिर दारु वाहतुक करणारे फोर्ड टि.डी.सी.आय क्रमांक एम.एच. ३१ सी आर ९५०१ अवैध दारु संबंधात झडती घेतली असता, नमुद क्रमांकाचे चारचाकी वाहना मध्ये खालील प्रमाणे माल मिळुन आला

१. किमंत :- ५१,५००/- रुपये देशी दारु सुप्रीम सॉनीक रॉकेट कंपणीच्या प्रत्येकी ९० मिली क्षमतेच्या १०३० सिलबंद निपा

३. किमंत :- ३,७५,०००/- रुपये फोर्ड टि.डी.सी.आय कंपणीचे क्रमांक एम.एच. ३१ सी आर ९५०१ दारु वाहतुकीकरीता वापरती

असा एकुण ४,२६,५००/- रुपयाचा मुद्देमाल घटनास्थळावरुन जप्त केला. अवैध दारु विक्री करण्याकरीता बेकायदेशिर वाहतुक करणारे अवैध दारु विक्रेते नामे चंद्रय्या गड्डुमवार रा. कुरुड ता. चामोर्शी तसेच श्रिकांत बोईनवाड रा. देवळी ता. चामोर्शी यांचे विरुध्द पो.स्टे. चामोर्शी येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखे कडुन होत असलेल्या कारवाई मुळे गडचिरोली जिल्हयातील तसेच शेजारील चंद्रपुर जिल्हयातील अवैध दारु विक्रेते इसम धास्तावलेले आहेत.


MH.31.CR.9501